Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -304 | MONDAY DT.05 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4
बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३०४ | सोमवार,दि.०५ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रु | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




• बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955



देशातील उत्तराखंडमध्ये

## समान नागरी कायद्याला मंजूरी

प्रतिनिधी | उत्तराखंड

उत्तराखंडमधून मोठं वृत्त हाती आलं आहे. उत्तराखंड कॅबिनेटने समान नागरी कायद्याला मंजूरी दिली आहे. निवृत्त नायाधीशांच्या समितीच्या शिफारशीनंतर उत्तराखंड सरकारने मंजूरी दिली आहे. समान नागरी कायद्याला मंजुरी दिल्याने उत्तराखंड राज्य हा कायदा लागू होणारे पहिलं राज्य ठरणार आहे.

उत्तराखंडमधील सरकारने त्यांच्या राज्यात समान नागरी कायद्याला मंजुरी दिली आहे. उत्तराखंड सरकारने समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखाली समिति स्थापन केली होती. या समितीच्या शिफारशीनंतर उत्तराखंड सरकारने मंजूरी दिली आहे. आगामी काळात होणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशनात हे विधेयक मांडलं सभागृहात मांडल जाणार आहे.

# महायुती सरकारमध्ये टोळीयुद्ध सुरु

## उद्धव ठाकरेंचा गंभीर आरोप

प्रतिनिधी | बीड

सिंधुदुर्ग : भाजपाची महायुती कमकुवत झाल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी केला. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समजून घेतलं पाहिजे, असंदेखील उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ठाण्यातील उल्हासनगर भागातील पोलीस ठाण्यात स्थानिक शिवसेना नेत्यावर (मुख्यमंत्री एकनाथ शिंदे छावणीचे) सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) आमदाराने गोळीबार केल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे वक्तव्य केलं.

सरकारमध्ये टोळीयुद्ध : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडीत एका सभेला संबोधित करताना ठाकरे म्हणाले की, १९९० च्या दशकात शिवसेना-भाजपा सरकारनं मुंबईतील अंडरवर्ल्ड टोळ्यांचं कंबरडं मोडलं होतं. परंतु, सध्याच्या सरकारमध्ये आता टोळीयुद्ध सुरू झालं आहे. ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्यातील तिसरी टोळी भाजपाच्या गळ्यात पडली आहे. त्यामुळं त्यांना डोकंवर काढायला वेळ नाही, असा आरोप उद्धव ठाकरे कुणाचंही नाव न घेता केला.

पुढच्या वर्षी प्रजासत्ताक दिन होणार नाही : इतर पक्षांना फोडून भाजपात सामील करून घेण्याच्या प्रवृत्तीमुळं राज्य भाजपा युनिट कमकुवत झालं आहे. हे मोदींनी समजून घ्याला हवं असा हल्लाबोल देखील ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केला आहे. माझा कोणत्याही एका व्यक्तीला विरोध नसून खोटेपणा हुकूमशाहीला विरोध आहे. देशात पूर्ण बहुमत असलेल्या सरकारची गरज नाही. तर विविध विचारांच्या पक्षांना सोबत घेऊन जाणाऱ्या सरकारची देशाला गरज आहे, असंही ठाकरेंनी सांगितलं. जर भाजपा पुन्हा लोकसभा निवडणुकीत जिंकल्यास पुढच्या वर्षी प्रजासत्ताक दिन होणार नाही, असा दावा त्यांनी केला.

पंतप्रधानांनी मालवणात येऊन पाणबुडी नेली : नौदल दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी मालवणात आले होते. मात्र, त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याला काही दिलं नाही. तर मंजूर पाणबुडी प्रकल्प गुजरातला नेल्याचं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.सत्तेच्या उबेसाठी सबुरी विसरली : शिवसेना कोणांची 'हे' ठरवण्यासाठी गद्दारांची गरज नाही. ती जनतेला माहीत आहे. जनता माझं सर्वस्व आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचं नाव न घेता केली आहे. आठवड्यातून दोनदा शिर्डीला जाणारे लोक सत्तेच्या उबेसाठी आपली श्रद्धा आणि सबुरी विसरतात, असा टोलादेखील ठाकरेंनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना लगावला आहे. माझ्याकडं आलेला माणूस चांगला आहे, असं म्हणत तुम्ही त्याला निवडून दिलं. मात्र, त्यांनी गद्दारी केली. त्यांच्या नसानसात गद्दारी भिनली आहे, अशा शब्दात त्यांनी केसरकर यांचं नाव न घेता



त्यांच्यावर टीका केली.

हृदयात राम असणार हिंदुत्व : आम्ही हिंदुत्व सोडलं, म्हणून आरडाओरडा करून धर्मांमध्ये भांडणे लावणारा आमचा हिंदू धर्म नाही. आमच्या हृदयात राम तसंच जनतेच्या हाताला काम असं आमचं हिंदुत्व आहे, असं ठाकरेंनी म्हटलं आहे. काँग्रेसनं राबवलेल्या योजनाच्या नावात बदल करून भाजपा त्या राबवत असल्याची टीका ठाकरेंनी केली आहे.

हे नेते होते उपस्थित- यावेळी खासदार विनायक राऊत, आमदार भास्कर जाधव, वैभव नाईक, वरुण सरदेसाई, मिलिंद नार्वेकर, गौरीशंकर खोत, अरुण दुधवडकर, जान्हवी सावंत, जिल्हाप्रमुख संजय पडते, संदेश पारकर, सतीश सावंत, अतुल रावराणे, शैलेश परब, रुपेश राऊळ, बाळा गावडे, सुशांत नीरव, गणेश नाईक, रावसाहेब दानवे, नारायण सावंत, संजय पडते, संदेश पारकर, दळवी भारती आदिंची उपस्थिती होती.

# प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी गहिनीनाथ गडावर नेहरकर दाम्पत्याकडून हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी

### डॉ. तुकाराम नेहरकर व सौ.रेखाताई नेहरकर यांची प्रतिवर्षी वामनभाऊंच्या पुण्यतिथी निमित्त सेवा





पाटोदा ।प्रतिनिधी

संत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने डॉ.तुकाराम नेहरकर व सौ.रेखाताई नेहरकर यांच्या वतीने याही वर्षी संत वामनभाऊ समाधी मंदिरावर हेलिकॉप्टर द्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली. मूळ घाटशीळ पारगाव येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते तथा जागतिक आरोग्य सल्लागार डॉ.तुकाराम नेहरकर व सौ.रेखाताई तुकाराम नेहरकर या दाम्पत्याने संत वामनभाऊ यांच्या पुण्यतिथी निमित्ताने हेलिकॉप्टरमधून समाधीस्थळी पुष्पवृष्टी करण्याचा पायंडा सुरू केला आहे. शनिवारी (दि.०३) राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते समाधी स्थळी मानाची महापूजा करण्यात आली, यावेळी प्रथमच वंचित बहुजन आघाडीचे नेते ऍड.प्रकाश आंबेडकर हे ही उपस्थित होते.

दरम्यान पुण्यतीथी सोहळ्याची सांगता काल्याच्या हरिकीर्तनाने झाली. यावेळी संत वामनभाऊ यांच्या समाधीवर ११.४५ वा नेहरकर दाम्पत्याने आयोजित केलेल्या हेलिकॉप्टर ने पुष्पवृष्टी करण्यात आली. या सोहळ्याला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांची विशेष

(उर्वरीत पान २ वर)



## ओबीसी-मराठा वाद स्क्रिप्टेड

### जनाची नाही तर मनाची लाज बाळगा; नाना पटोले यांचा सरकारवर घणाघात

प्रतिनिधी | गोंदिया

राज्यामध्ये सध्या सुरू असलेला ओबीसी विरुद्ध मराठा हा वाद सरकारनिर्मित तसेच स्क्रिप्टेड आहे. काँग्रेसला याबद्दल काहीही बोलायचं नाही. सरकारच्या वतीने हा वाद मुद्दाम घडवून जनतेच्या मूळ प्रश्नांना डायव्हर्ट करण्याचं काम केलं जात आहे. काँग्रेसला या वादात पडायचं नाही. राज्यात आणि देशात आज महागाई, बेरोजगारी सारखे ज्वलंत प्रश्न असतांना त्याकडे कोणाचे लक्ष नाही. मुळे मुद्द्यावर लक्ष केंद्रित करून सरकारला ते मुद्दे सोडवायला भाग पाडण्याचे काम काँग्रेस करणार असल्याचे मत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केले आहे.

जनाची नाही तर मनाची लाज बाळगा

(उर्वरीत पान २ वर)



दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे यांना एकता पत्रकार संघाच्या वतीने या वर्षीचा मूकनायक पुरस्कार प्रदान करण्यात आला.या वेळी त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देऊन सत्कार करतांना मा.जी. प. सदस्य गणपत डोईफोडे, संपादक अशोक होळकर, सुंदर देशमुख, अशोक सपकाळ,सचिन नरनाळे, संभाजी डोईफोडे,पेंढारे आदी छायाचित्रात दिसत आहेत.

# शिवजन्मोत्सव निमित्त उमरीत बैलगाडा शर्यतीचे आयोजन

### विजेत्यांना मिळणार लाखो रुपयांची बक्षिसे

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील उमरी येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही सार्वजनिक शिवजन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाच्या आयोजन केले आहे. बैलगाडा शर्यत, आरोग्य शिबिर , रक्तदान शिबीर,पालखी सोहळा यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावर्षी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर बैलगाडा शर्यत ठेवली असून या बैलगाडा शर्यतीत विजेत्यांना लाखो रुपयाची बक्षिसे मिळणार आहेत. या बैलगाडा शर्यतीत बैलगाडा प्रेमींनी भाग घ्यावा, असे आवाहन काशी विश्वनाथ चॅरिटेबल ट्रस्ट बीड व सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती उमरी यांनी केले आहे.

तालुक्यातील उमरी येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो यावर्षी शिवजयंतीचे सहावे वर्षे असून यामध्ये बैलगाडा शर्यत विशेष आकर्षण ठरणार आहे. बैलगाडा शर्यत ओपन मैदानावर दि.१४ फेब्रुवार रोजी खेळली जाणार आहे. यामध्ये बैलगाडा शर्यतीत

(उर्वरीत पान २ वर)



### रुग्णांना आरोग्य शिबीर ठरणार उपयोगी

शिव जन्मोत्सवानिमित्त दि.१८ रोजी आरोग्य शिबीरात जिल्ह्यातील नामवंत डॉक्टर सहभागी होणार आसुन रक्तदान शिबीर ही होणार आहे.दि.१९ रोजी ढोल ताशांच्या गजरा मध्ये भव्य पालखी सोहळा मिरवणूक होणार आहे. शिवजन्मोत्सव निमित्त होणाऱ्या कार्यक्रमास तालुक्यातील शिवप्रेमींनी लाभ घ्यावा असे आवाहन काशी विश्वनाथ चॅरिटेबल ट्रस्ट बीड व सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती उमरी यांनी केली आहे.

# चांदापुर येथे १० फेब्रुवारी रोजी १० व्या धम्म परिषदेचे आयोजन

### धम्म उपासकांनी सहभागी व्हावे - स्वागताध्यक्ष ऍड.अनंतराव जगतकर यांचे आवाहन

प्रतिनिधी | परळी

परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा - क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही शनिवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी दहाव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषदेला पुज्य डॉ.भदन्त उपगुप्त महाथेरो (पुर्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली पुज्य डॉ.भदन्त महाविरो (काळेगाव), पुज्य भदन्त पय्यानंद (लातूर) आणि पुज्य भिक्खू धम्मशील थेरो (हिंगोली / बीड) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. या धम्म परिषदेचे सम्यक संकल्प या पेजवरून फेसबुक लाईव्ह थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. याचा लाभ धम्म उपासकांनी घ्यावा असे आवाहन पुज्य भिक्खु धम्मशील थेरो, धम्म परिषदेचे स्वागताध्यक्ष ऍड.अनंतराव जगतकर यांनी केले आहे.



पु. डॉ. भदन्त उपगुप्त महाथेरो,पुर्णा | डॉ. भदन्त महाविरो काळेगाव | पु.भदन्त पय्यानंद लातूर | पु. भिक्खुधम्मशील थेरो, हिंगोली/बीड

तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर, ता.परळी येथे शनिवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे दहाव्या बौद्ध धम्म परिषदेची सुरूवात सकाळी ९ वाजता पंचरंगी धम्म ध्वजारोहणाने होईल. या धम्म परीषदेच्या स्वागताध्यक्षपदी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीचे अध्यक्ष ऍड.अनंतराव जगतकर हे असणार आहेत.

याप्रसंगी प्रा.डॉ.सुरेश वाघमारे (ज्येष्ठ विचारवंत, लातूर) यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सिताबाई बनसोडे (नगराध्यक्षा, केज),

(उर्वरीत पान २ वर)

## संपादकीय

### ‘मेसेज फॉरवर्ड’ करण्यापेक्षा विचाराने फॉरवर्ड होऊया!

साधारण २५ ते ३० वर्षांपूर्वी केलेले लेखन प्रसिद्ध करण्यास मर्यादा होत्या. पुस्तके काढणे अनेकांना अशक्य असे आणि पुस्तक प्रत्येकाचेच निघत नसे. पुस्तक लेखनामध्ये आणि ते प्रसिद्ध करण्यामध्ये दर्जासुद्धा कायम राखला जात असे. हीच गोष्ट वृत्तपत्र लेखनामध्येसुद्धा असे. बातमी लेखनापासून ते लेख लेखनापर्यंत प्रत्येक गोष्टीमध्ये दर्जा सांभाळला जात असे. त्याचे संपादन केले जात असे. त्यामुळे वाचकांसाठी मोजकेच आणि योग्य मर्यादित स्वरूपाचे लेखन समोर येत असे.

मात्र ही स्थिती गेल्या २५ वर्षांत खूपच बदलली आहे. कारण आता सोशल मीडिया अधिक सक्रिय झाला आहे. त्यामुळे कोणीही लेखक होऊ लागलाय, कोणीही बातमीदार होऊ लागलाय आणि या सगळ्याचा परिणाम साहित्य आणि वृत्तपत्र क्षेत्रांमध्ये अधिक होताना दिसून येतोय. कुणाचीही कविता आपल्या नावाने खपवून, कुठल्याही कवितेची तोडमोड करणं, कुणाचेही लेख, साहित्य आपल्या नावावर वापरणं, कुठल्याही प्रकारची मतं व्यक्त करणे, अभ्यास न करता बोलणं अशा अनेक गोष्टी आता सोशल मीडियाच्या माध्यमातून दिसू लागल्या आहेत. प्रत्येकालाच व्यक्त व्हायचं असतं. पण प्रत्येक गोष्टीला काही मर्यादा आणि चौकटी समाजानेच घालून दिलेल्या आहेत. म्हणूनच समाजात कवी, लेखक, पत्रकार, विचारवंत यांना आतापर्यंत एक मानाचं स्थान होतं. त्यांनी मांडलेले विचार हे समाजमान्य विचार आहेत, असंच म्हटलं जायचं.

मात्र ही व्याख्या हळूहळू पुसट होतेय की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यात हाती आलेले सोशल मीडियाचं हे शस्त्र दुधारी आहे. यातून अनेक चांगल्या गोष्टी होतात. मात्र त्याच वेळेला सर्वाधिक वाईट गोष्टी झालेल्यासुद्धा या सोशल मीडियामुळे पाहायला मिळत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये सोशल मीडियावर आलेले व्हीडिओ, मेसेजेस, त्यातून ठेवण्यात आलेले स्टेटस या सगळ्याच प्रकारातून समाज ढवळून निघाला. यापूर्वी आपल्या मनात येणारे योग्य, अयोग्य विचार यांना वळण लावण्यासाठी आपल्यासमोर विचारवंतांनी, लेखकाने मांडलेले मार्गदर्शक विचार पुस्तकातून, लेखातून उपलब्ध असायचे. त्यातूनच घरातले ज्येष्ठ मंडळी, आपले शिक्षक, प्रोफेसर यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन आपण योग्य दिशेने विचार करतो आहोत की नाही, आपली मत योग्य दिशेने आपण व्यक्त करत आहोत की नाही याबाबत तरुण पिढीला समज मिळत असे. मात्र सोशल मीडियामध्ये हा मार्गच आता उपलब्ध नाही असं वाटतं.

‘फॉरवर्डिंग’ ही एक अत्यंत गंभीर प्रक्रिया सोशल मीडियाच्या या जगामध्ये पाहायला मिळते. आपल्या मोबाइलवर असलेल्या कुठल्याही सोशल मीडिया पवर आलेला कुठलाही मेसेज, कुठलाही व्हीडिओ विचार न करता फॉरवर्ड केला जात आहे. वास्तविक आपण जे वाचतो, आपण जे पाहतो किंवा आपण जे ऐकतो आहोत ते दुसऱ्याला पाठवण्याआधी योग्य आहे की अयोग्य आहे याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे; परंतु हा सोशल मीडिया अगदी बालवाडीत जाणाऱ्या मुलापासून वयोवृद्धांपर्यंत, अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत, प्रौढांपासून आक्रमक विचारांच्या तरुणांपर्यंत सगळ्यांच्याच हातात आहे. त्यातही वयोगट, स्त्री–पुरुष अशा कोणत्याही गटांसाठी चाळण करून हे मेसेज फॉरवर्ड केले जात नाहीत.

# आ.सुरेश धस यांचा वाढदिवस मतदारसंघात विविध सामाजिक,शैक्षणिक उपक्रमाद्वारे साजरा

आष्टी ।प्रतिनिधी

वाढदिवस म्हणजे आजवरच्या आयुष्यात आपल्याला जे काही मिळालं त्याबद्दल सर्वांचे आभार मानून, त्याची परतफेड म्हणून समाजाला आपल्यापरीने जे देता येईल ते द्यायच.. ही शिकवण माझे वडील स्व.रामचंद्रदादांनी दिली यंदा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय मी घेवून माझ्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या सहकाऱ्यांना, पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना, नागरिकांना आणि हितचिंतकांना माझ्या वाढदिवसानिमित्त इतर खर्च टाळून विधायक सामाजिक उपक्रम राबविण्याचं आवाहन केलं. माझ्या एका हाकेला साद घालत आज माझ्या जन्मदिनी अनेक सामाजिक कार्यक्रम राबवून माझा आनंद द्विगुणीत केल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतोअशी भावना व्यक्त करत आ.सुरेश धस यांनी सर्वांचेच आभार व्यक्त केले.

आ.सुरेश धस यांच्या जन्मदिनी आयोजित केलेले विविध सामाजिक,शैक्षणिक उपक्रमामध्ये पाटोदा नगरपंचायतीमध्ये युवा नेते जयदत्त धस आणि मान्यवरांच्या हस्ते नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, गटनेते, सर्व नगरसेवक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर, दिव्यांग बंधूंना कपडे वाटप, दिव्यांग माता भगिनींना साड्यांचे वाटप करुन तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय दप्तर वाटप युवा नेते जयदत्त धस, पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष, उपानगराध्यक्ष, सभापती, नगरसेवक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक यांच्या उपस्थितीत पार पडला.. कासारी/मुर्शदपूर ग्रामपंचायत आणि आ.सुरेश धस मित्र मंडळाच्या वतीने मुर्शदपूर कासारी, शिदेवाडी येथील शालेय विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले.

सांगली जिल्ह्यातील वांगी येथे आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ.पतंगराव कदम सहकारी साखर कारखाना येथे स्व.लोकनेतवगोपीनाथरावजी उसतोड मंजूर,मुकादम संघटनेचे पाटोदा तालुका उपाध्यक्ष भरत लहू लवांडे यांच्यावतीने ऊसतोडणी मजुरांसाठी स्वच्छ पाणी पिण्यासाठी जवळपास दोन लक्ष रुपये खर्चून आर.ओ.प्लँट दिला आहे.



अशोक सुपेकर आणि आ.सुरेश धस मित्र मंडळ आणि भारतीय जनता पार्टी डोंगरकिन्ही जिल्हा परिषदेच्या अंतर्गत हनुमान टेकडी नायगांव येथील हनुमान मंदिरामध्ये महाभिषेक करण्यात आला..माऊली बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सेवाभावी संस्था मुर्शदपुर तर्फे शासकीय माध्यमिक आश्रम शाळेला (सुरुडी) ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट देण्यात आला.

त्याच बरोबर..जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानडी खुर्द (मेहकरी)ता. आष्टी येथे विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना वही व पेन वाटप करण्यात आले.. जिल्हा परिषद शाळा नांदा येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले.गहुखेल येथील व्रुद्धेश्वर विद्यालय माध्यमिक व जि.प.शाळा गहुखेल येथील दोन्ही शाळेत वह्या वाटप व जि.प.शाळेला २१ महापुरुषांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या.. नांदा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शालेय साहित्य वाटप करण्यात आले

ऋडोंगरकिन्ही ता.पाटोदा येथे देखील शालेय विद्यार्थांना शालेय साहीत्य वाटप करण्यात आले..सरपंच दत्तात्रय खोटे यांनी ग्रामपंचायत कार्यालय सांगवी पाटण च्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी पाटण व सुदर्शन विद्यालय तसेच अंगणवाडी मुलांना शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले..आष्टी येथील कन्या प्रशाला व जिल्हा परिषद शाळा मुलांची येथे नगरसेवक किशोर झरेकर यांच्या वतीने शालेय उपयोगी टिफिन बॉक्स (जेवणाचा डबा )विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.देऊळगाव घाट तांडा तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेत वर्ग १ ते ४ या सर्व विद्यार्थ्यांना वही आणि शाळेची किट वाटप करण्यात आले.चिंचाळा व राधापूर येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले.आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालय येथे सरकार ग्रुप महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सचिन लोखंडे यांच्या वतीने शालेय साहित्य तसेच विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबरविहीरा येथे शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.बळेवाडी येथे शेतकऱ्यांना षिाश, ाि ज्ञळीरप शज्ञूल ,कृषी विभागाच्या योजनेविषयी माहिती देण्यात आली.पाटोदा नगरपंचायतच्या वतीने दिव्यांग बंधूना नवे कपडेॠ तर दिव्यांग भगिनींना साडी आणि विद्यार्थ्यांना दप्तर देण्यात आले.शिरूर कासार येथे नगरपंचायत उपनगराध्यक्ष प्रकाश देसरडा आणि बडजाते हॉस्पिटल यांच्या संयुक्त विधमाने भव्य दिव्य आरोग्य शिबिर राबविण्यात आले.जानपीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नाळवंडी कारेगाव येथील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.सुंबेवाडी येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले..जिल्हा परिषद शाळा बीडसांगवी येथे सरपंच नंदकुमार करांडे यांच्यावतीने मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फत्तेवडगाव व अंगणवाडी येथे वही पेन वाटप करण्यात आले.डोंगरगण येथे माजी सरपंच दत्ताभाऊ चव्हाण यांच्याकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप..महेश शेठ हंबर्डे यांच्या वतीने पांढरीतील सर्व जिल्हा परिषद शाळेमध्ये शालेय साहित्य वाटप करण्यात आले .

हाजीपुर जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप करण्यात आले.आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालय येथे सरकार ग्रुप महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सचिन लोखंडे यांच्या वतीने शालेय साहित्य तसेच विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचपूर सरपंच सतीष ढवळे आणि आ.सुरेश आण्णा धस मित्र मंडळ चिंचपुर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व भोजन देण्यात आले.

कोतन ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या जिल्हा परिषद शाळा कोतन,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महादेववस्ती, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेदरे–मेंगडे वस्ती या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांना मोफत शालेय पुस्तक संच वाटप करण्यात आले.कडा येथे सरपंच युवराज पाटील यांच्याकडून अल्पोपहार बअन्नदान करण्यात आले.आष्टी नगरपंचायत आरोग्य सभापती सुरेश वारुंगळे यांनी भीम नगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय साहित्याचा वाटप केले..

# बीडमध्ये बुद्धसृष्टीचे भूमिपूजन उत्साहात!



### पप्पू कागदे : आंबेडकरी जनतेचा अभिमानास्पद निर्णय

बीड / प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आणि आंबेडकरी जनतेकडून घेण्यात आलेला बुद्ध सृष्टीचा निर्णय अभिमानास्पद आहे. जयंतीच्या जमा रक्कमेतून हा ऐतिहासिक निर्णय झाला आहे. येणाऱ्या काळात बीडची बुद्धसृष्टी पर्यटन होईल. त्यासाठी आपण सर्वजण मिळून धम्मकार्य गतिमान करुयात, असे मत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.

बीड शहरातील पालवण चौक येथील नागसेन बुद्ध विहार येथे शनिवार (दि.३) रोजी बुद्धसृष्टी कामाचे भूमिपूजन आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करताना पप्पू कागदे बोलत होते. यावेळी प्रशांत वासनिक, अरुणाताई आठवले, शीतलकुमार सुकाळे, संतोष जाधव, प्रा.बाळासाहेब गव्हाणे,मनोज मस्के, प्रा.अशोक गायकवाड, कॅप्टन राजाभाऊ आठवले, किसन तांगडे, अविनाश जोगदंड, भींग्रेश जोगदंड, विलास जोगदंड, मारुतीराव सुरवसे, उजगरे बापू, ज्ञानोबा पोटभरे, उमाजी वाघमारे, लखन जोगदंड, समाधान जाधव, कल्याण गाडे, व्ही.आर.गाडे, यशवंत कदम, विलास चक्रे ,केतन गायकवाड



# राष्ट्रीय समाज पक्षाची गाव तेथे शाखा ऊभारणार - मुक्तिराम आबुज

माजलगाव ।प्रतिनिधी

राष्ट्रीय समाज पक्षाच्या माजलगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांची शासकीय विश्रामगृह येथे बैठक पार पडली.या बैठकीला रासपाचे नवनिर्वाचित मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष कल्याणराव गवते तसेच नुतन जिल्ह्याधक्ष कपिल गाडेकर हे उपस्थित होते त्यांचा सत्कार राष्ट्रीय समाज पक्ष माजलगावच्या वतीने करण्यात आला.महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुक स्वबळावर लढणार आहे.महादेव जानकर यांचे विचार हे प्रत्येक गावातील नागरिका पर्यंत पोहोचले पाहिजेत असे प्रतिपादन तालुकाध्यक्ष मुक्तिराम आबुज यांनी केले.गाव तेथे राष्ट्रीय समाज पक्षाची शाखा उभारुन तेथील नागरिकांशी सुसंवाद साधून नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे निरसन करू असे आश्वासन जिल्हाध्यक्ष कपिल गाडेकर यांनी या बैठकीत दिले.

या बैठकीला उपस्थित महिला जिल्हाध्यक्षा किरण ताई डोळस, विधानसभा अध्यक्ष हरीभाऊ कांडुरे, वडवणी तालुकाअध्यक्ष.बालाजी काळे,तालुका संपर्क प्रमुख दत्ता सातपूते,सोशल मीडिया प्रमुख कृष्णा सरवदे, मल्हारी मार्तंड अर्बन चे विशाल देवकते, सुखदेव माने,युवा नेते रामदास नरवटे, शहर उपाध्यक्ष अमोल थावरे, शिवाजी महाराज गडदे,अंगद पारेकर, परमेश्वर शिंदे,पाराजी आबुज,गोविंद चांभारे असे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

## पान १ वरून...

**ओबीसी–मराठा....**

मंत्री छगन भुजबळ सारख्या मंत्रीपदावर असलेल्या व्यक्तीने अशा प्रकारचे वक्तव्य करणे हे खऱ्या अर्थाने संविधानिक व्यवस्थेचा अपमान करणारे आहे. नाभिक समाज महत्त्वपूर्ण घटक असून त्या समाजाचा कोणी अपमान करत असेल तर, त्याच्या आम्ही निषेध करतो. सरकारने देखील या संदर्भात गांभीर्याने लक्ष घालून कारवाई करायला पाहिजे. या सरकारनं ’जनाची नाही तर मनाची लाज बाळगली’ पाहिजे, अशा शब्दात नाना पटोले यांनी मंत्री छगन भुजबळ यांनी केलल्या व्यक्तव्यावर भाष्य करत सरकारवर घनाघात केला.

**प्रतिवर्षी प्रमाणे याही ....**

उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथील विविध विकासाच्या २३ कोटी रुपयांच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. संत वामानभाऊंचे हे तिर्थस्थळ अत्यंत पवित्र व चैतन्यमय असल्याचे म्हणत स्थळी हेलिकॉप्टर द्वारे केलेल्या पुष्पवृष्टीचे श्री फडणवीस यांनी विशेष असे कौतुक करून नेहरकर दाम्पत्य यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी देखील नेहरकर दाम्पत्याच्या या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले.

**चांदापुर येथे १० ...**

नालंदा अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर वडमारे, इंजि.अभिमन्यू चव्हाण (मा.कार्यकारी अभियंता, मराविम), इंजि.राजु बोबडे (उपकार्यकारी अभियंता, मराविम), माजी नगरसेवक प्रा.डॉ.विनोद जगतकर, प्रा.प्रदीप रोडे (प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, बीड), डी.एस.राठोड (संस्थापक, नाईक सेवा शिक्षण प्रसारक मंडळ), त्रिंबक रोडे (प्रधान तंत्रज्ञ, मराविम), आनंद वाघमारे (धम्मसेवक, पट्टीवडगाव), मिलिंद नरबागे, प्रसिद्धीप्रमुख प्रा.बालाजी जगतकर, प्रा.विलास रोडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, ज्या उपासकांना धम्म परीषदेला उपस्थित रहावयाचे आहे. त्या धम्म उपासकांनी पांढरे वस्त्र परिधान करूनच धम्म परिषदेत सहभागी व्हावे तसेच वसंतनगर तांडा, चांदापूर ता.परळी वैजेनाथ या ठिकाणी धम्म परिषदेस येताना पुस – नंदागौळ – वसंतनगर तांडा मार्गेच यावे. असे आवाहन संयोजन समितीने केले आहे. धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै. जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, प्रा.गौतम गायकवाड, व्यंकट वाघमारे, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे हे प्रयत्न करीत आहेत. तर चांदापुर येथे १० व्या बौध्द धम्म परीषदे निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमास या विभागातील उपासकांनी मोठ्या संख्येने सहभागी असे आवाहान करण्यात आले आहे.

**शिवजन्मोत्सव निमित्त....**

प्रथम येणाऱ्या विजेत्यास आसाराम घायतिडक ३१,१३१ रु द्वितीय बक्षीस पत्रकार वैजनाथ घायतिडक २१,१२१, तिसरे बक्षीस बैलगाडा शर्यत आयोजक कमेटी १५,५१५,चौथे बक्षीस महादेव माने ११,१११ रू., पाचवे बक्षीस ज्ञानेश्वर घायतिडक ७,७७७ रू., सहावे बक्षिस मित्र प्रेम ग्रुप ५५५५ रू., सातवे बक्षीस मथुरदास घायतिडक ३,३३३ रूपये आसी बक्षिसे दिली जाणार आहेत. बैलगाडा शर्यती मध्ये भाग घेणाऱ्या साठी प्रवेश फीस पाचशे रुपये राहणार असुन स्पर्धेत भाग घेणाऱ्या बैलगाडा प्रेमींनी लाभ घ्यावा असे आवाहन बैलगाडा शर्यत कमिटी व सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती उमरी यांच्या वतीने केले आहे.

# मराठा आरक्षणासाठी मा.सर्वोच्च न्यायालयासह मा.मुंबई उच्च न्यायालय व छत्रपती संभाजी नगर, नागपूर खंडपीठात कॅव्हेट दाखल– गंगाधर काळकुटे पाटील

बीड ।प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात सद्यस्थितीवर राज्य सरकारने काढलेले आदेश सूचनेचा मसुदासह इतर शासन निर्णया संदर्भात राष्ट्रीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गंगाधर काळकुटे पाटील यांनी नुकतेच मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली,मा. उच्च न्यायालयात मुंबई, उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर व मा.उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे एकाच वेळी चार ठिकाणी कॅव्हेट दाखल केले आहे.



मराठा आरक्षण संदर्भात राज्य सरकारने काढलेली अधिसूचनासह इतर शासन निर्णय यासाठी गंगाधर काळकुटे पाटील यांनी मा. सर्वोच्च न्यायालयासह,मा. मुंबई उच्च न्यायालयात व छत्रपती संभाजी नगर व नागपूर खंडपीठात कॅव्हेट दाखल केल्याबद्दल मराठा समाजाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. कॅव्हेट दाखल केल्यानंतर आज गंगाधर काळकुटे पाटील हे आज अंतरवाली सराटी येथे जाऊन मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन याबद्दलचे सर्व कागदपत्र त्यांना सुपूर्त करणार

# मराठा आरक्षणासाठी उच्च न्यालयात आज कॅव्हेट दाखल ॲड. योगेश शेळके

मराठा आरक्षणासाठी राज्य सरकार ने काढलेली अधिसूचनेला कोणी आव्हान दिले तर मराठा समाजाची बाजु मांडल्या शिवाय कोणताही न्यायालयीन निर्णय होऊ नये या साठी आज उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर (औरंगाबाद) मध्ये कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. आमचे वकिली करणारे मराठा समाजाची नेहमी बाजू मांडणारे मित्र ॲड. ज्ञानेश्वर पोकळे पाटील यांच्या समोर आज मराठा समाजाचे अनेक विषय त्यांनी समजून घेतले. राज्य सरकार ने काढलेली मराठा आरक्षणाची अधिसूचनेला टिकवण्यासाठी आज हाय कोर्टात कॅवेट दाखल केले आहे. जी जबाबदारी सरकारची असते. सरकार निभावत नसल्याने ती जबाबदारी आपले वकील बांधव निभावत आहेत. आम्ही अनेक वकील बांधव उच्च न्यालयाच्या वकिलांच्या कायम संपर्कात आहोत. हा लढा आपण आंदोलन च्या माध्यमातून लढला, तसाच हा लढा आता आपण न्यायालयीन लढणार आहोत, मराठा आरक्षणासाठी मराठा युवकाचे मोठे बलिदान गेले आहे, तसेच मराठा समाजातील युवकांचे नोकरी व शिक्षणामध्ये खूप मोठा अन्याय सहन करावा लागत आहे. या लढ्यासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील याचे मोठे योगदान आहे. तरी राज्य सरकार याची खबरदारी घेत नाही. यासाठी आज मुबंई उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर (औरंगाबाद) या मध्ये मराठा आरक्षणाची बाजू मांडण्यासाठी ॲड. ज्ञानेश्वर पोकळे पाटील याच्या माध्यमातून आज कॅव्हेट पिटिशन नंबर २४९/२०२४ नुसार दाखल करण्यात आले आहे.



# केज पोलिसांत पाच जणां विरुद्ध ३०७ व ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल

प्रतिनिधी केज

केज शहरातील पंचायत समितीच्या मैदानावर विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रम पाहत असताना एका युवकाला जाती वाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याबद्दल पाच जणां विरुद्ध केज पोलिसांत ३०७ व ट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतची सविस्तर माहिती अशी की,दिनांक २८ जानेवारी २०२४ रोजी केज शहरातील पंचायत समितीच्या पाठीमागील मैदानावर विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यास गेलेल्या एका युवकाला पाच जणांनी जातीवाचक शिवीगाळ करून धारदार शस्त्राने वार करून जीवेमारण्याचा प्रयत्न केला आहे.अंशउर्फ सोनू सुदेश शिरसट वय १९ वर्ष रा.महात्मा फुले नगर केज येथीलरहिवासी असून अंश शिरसट हा इयत्ता बारावी मध्ये शिकत असून त्याचे वडील सुदेश शिरसट हे खाजगी काम करून कुटुंबाचा उदर निर्वाह चालवत आहेत.

दिनांक २८ जानेवारी २०२४ रोजी अंश हा त्याच्या घरी असताना रात्री ९–०० वाजण्याच्या दरम्यान त्याचा मित्र आदित्य हजारे याचा फोन आला व अंश ला म्हणाला की,पंचायतसमिती मैदाना वर सांस्कृतिक कार्यक्रम आहे तू तेथे कार्यक्रम बघण्यासाठी ये असे त्याच्या मित्राने म्हणल्या वर अंश लगेच मोटर सायकलवर बसून पंचायत समिती मैदानावर गेला. तेथे त्याला त्याचा मित्र आदित्य हजारे हा भेटला. त्यानंतर अंश व आदित्य असे दोघेजण सांस्कृतिक कार्यक्रम चालू असलेल्या ठिकाणी मंचाजवळ कार्यक्रम बघत उभे होते. त्यावेळी पाठीमागूनत्याला कोणीतरी दगड मारल्याने तो पाठीमागे वळून पाहिले त्यावेळी अंश च्याओळखी चा ज्ञानेश्वर कोरडे यांनी अंश ला माय घाल्या तुझ्या मुळे आम्हाला कार्यक्रम दिसत नाही तू बाजूला हो असे म्हणून त्यांनी अंश ला शिवीगाळ केली त्यावेळी अंश ज्ञानेश्वरला म्हणाला की,तू मला शिवी का दिलीस? असे विचारले असता, तुझ्यामुळे आम्हाला पुढचे दिसत नाही तुझी औकात आहे का आमच्या समोर थांबण्याची ?

असे अंश व ज्ञानेश्वर या दोघांमध्ये बाचाबाची झाली असता आजूबाजूच्या लोकांनी त्यांचे भांडण मिटवले होते.त्यानंतर माझा मित्र आदित्य व मी कार्यक्रम पाहण्यासाठी तेथून दुसऱ्या बाजूला गेलो व कार्यक्रम पाहू लागलो. त्यानंतर अंदाजे ९–३० ते ९–४५ वाजण्याच्या दरम्यान मी थांबलो असलेल्या ठिकाणी उभा असताना पाठीमागून कोणीतरी धारदार शस्त्राने माझ्या पाठीच्या डाव्या बाजूला वार केला. त्या वेळेस मी पाठीमागे वळून पाहिले असता,ज्ञानेश्वर कोरडे यांच्या हातात चाकू सारखे धारदार शस्त्र होते. माझ्या पाठीत वार झाल्याने पाठीतून रक्त निघू लागले तेवढ्यात माझ्या ओळखीचे संकेत चौरे व अमर धपाटे यांनी माझे दोन्हीही

हात पकडून धरले तेव्हा ज्ञानेश्वर यांनी त्या धारदार शस्त्राने माझ्या पोटाच्या डाव्या बाजूला वार केले.त्यानंतर तेथे हजर असलेला ओळखीचा गणेश गिरी यांनी त्याच्या हातात चाकू सारख्या हत्यारांनी माझ्या गळ्यावर वार केला असता,तो मी चुकवला व तोवर माझ्या डाव्या हाताच्या दंडावर लागला जर तो वार माझ्या गळ्या वर लागला असता तर माझा जीव गेला असता.

# प्राचार्य सुहास मोराळे यांनी विद्यार्थ्यास गिरवले प्राचार्य पदाचे धडे



प्रतिनिधी बीड

माजलगाव येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे प्राचार्य सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक स्नेहसंमेलनाचे औचित्य साधून कॉलेज डे साजरा करण्यात आला. या कॉलेज डे कार्यक्रमांमध्ये एक दिवस संपूर्ण महाविद्यालय विद्यार्थ्यांनी चालवले. यामध्ये सेवकापासून ते प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथपाल, उपप्राचार्य, प्राचार्य अशा सर्व जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तम पद्धतीने व उत्साहात पार पाडल्या.

यामध्ये एकदिवसीय प्राचार्य पदाची भूमिका बी. कॉम. तृतीय वर्षाचा विद्यार्थी चि. सौरभ रांजवण याने पार पाडली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी त्यास आपल्या खुर्चीजवळ बसून प्रशासकीय कामकाज समजावून सांगितले. उपप्राचार्य म्हणून कु.भक्ती काळे, ग्रंथपाल म्हणून कु. प्रती पोले, तर सेवक म्हणून अनिकेत मोरे व प्राध्यापक म्हणून वेगवेगळ्या विद्यार्थ्यांनी आपल्या भूमिका अतिशय उत्तम प्रकारे पार पाडल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ युवराज मुळे,डॉ गजानन होन्ना स्नेसंमेलन प्रमुख डॉ ज्ञानेश्वर गवते, सहप्रमुख श्री परळकर यांनी प्रयत्न केले. असा हा नावीन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयात आयोजित केल्याबद्दल महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी, प्राचार्यांच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# परळीत ११ फेब्रुवारी रोजी रंगणार ६वे मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलन

## शिक्षणप्रेमी साहित्य रसिकांना मिळणार अभूतपूर्व मेजवानी

प्रतिनिधी परळी

परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आलेल्या ६ व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनात साहित्य रसिकांना दर्जेदार साहित्यिकांची साहित्यिक मेजवानी मिळणार असून या एक दिवसीय साहित्य संमेलनास साहित्यिक,शिक्षकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संमेलनाचे मुख्य संयोजक रानबा गायकवाड व स्वागत समितीने केले आहे.

परळी येथे साप्ताहिक शिक्षण मार्गाच्या वतीने ६ वे मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलन रविवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आले आहे. संत तुकोबाराय साहित्य नगरी, औद्योगिक वसाहत सभागृह येथे होणाऱ्या या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक व शिक्षण तज्ञ ए.तु. कराड हे आहेत. संमेलनाचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त लेखक, दिग्दर्शक डॉ. अनिलकुमार साळवे यांच्या हस्ते होणार आहे. तर नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव व कै. रामभाऊ अण्णा खाडे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रदीप खाडे हे स्वागत अध्यक्ष आहेत.

या एकदिवसीय संमेलनाचे उद्घाटन ११ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता होणार आहे . संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षण उपसंचालक व्ही. के. खांडके, माजी शिक्षक साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष विश्वंभर वराट, बीड जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी नागनाथ शिंदे, शिक्षक नेते पी. एस. घाडगे, परळी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्रीराम कनाके, अंबाजोगाई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने( काळे ), महात्मा फुले शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन बंडू आघाव उपस्थित राहणार आहेत.




पहिल्या सत्रात उद्घाटन समारंभात मराठवाड्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षक शिक्षिकांचा शिक्षक गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. तसेच स्मृतीशेष समाजभूषण विजयकुमार गंडले यांच्या स्मृती प्रित्यर्थ पहिला राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.अभिमान मुंडे आणि ज्योती मुळे लिखित 'भाषण क्रांती' पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या सत्रात दुपारी २ ते ३ पर्यंत होणाऱ्या परिसंवादात साहित्यिक तथा विचारवंत अजयकुमार गंडले यांच्या अध्यक्षतेखाली वसुंधरा महाविद्यालय घाटनांदुर चे प्राचार्य डॉ. अरुण दळवे आणि जिल्हा परिषद प्रशाला आडोळा, तालुका माजलगाव येथील पुरुषोत्तम जाधव सहभागी होणार आहेत. 'खाजगीकरणाच्या विळख्यात मराठी शाळांचा श्वास गुदमरतोय' व 'मराठी साहित्य आणि शिक्षकांची भूमिका' हे परिसंवादाचे विषय आहेत. परिसंवादाचे सूत्रसंचालन अभिमान मुंडे तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक अशोक नावंदे करणार आहेत.

तिसऱ्या सत्रात दुपारी ३ ते ४ यादरम्यान कथाकथन होणार आहे. यामध्ये ग्रामीण कथाकार रमेश मोटे, युवा कथाकार प्रा. डॉ. सागर कुलकर्णी आपल्या कथा सादर करतील. तर कथाकथन च्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कथाकार सिद्धेश्वर इंगोले राहणार आहेत. सूत्रसंचालन प्रा. संजय आघाव व आभार प्रदर्शन केशव कुकडे करतील.

दुपारी ४ ते ६ या वेळेत सत्र ४ थे महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी प्राचार्य अरुण पवार यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलनाचे होणार आहे. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.राजकुमार यल्लावाड व शाहीर अनंत मुंडे करणार आहेत. कवी संमेलनात विश्वंभर वराट, नागनाथ बडे, प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे, राजेश रेवले, नागोराव तिपलवाड, बालाजी मुंडे, विद्याधर पांडे, दत्ता वालेकर, देवराव चामनर, भवनराव देशमुख, भारत सालपे, सखा गायकवाड, प्रकाशसिंग तुसाम, दिवाकर जोशी, प्रा डॉ.सिद्धार्थ तायडे, बा. सो. कांबळे, प्रा.संजय आघाव, श्रीकृष्ण चाटे, गणपत कांदे, रंगनाथ मुंडे, सिद्धेश्वर इंगोले, केशव कुकडे, गणपत गणगोपालवाड, विजया दहिवाळ, संध्या शिंदे, सुनीता कोम्मावार, तीलोत्तमा इंगोले, प्रा. अर्चना चव्हाण, रागिणी अंबाड, सतीश जाधव, नितीन ढाकणे, गोविंद हाके ,बालाप्रसाद चव्हाण, मोहन राठोड, प्रा. किशन शिनगारे, रामचंद्र कागणे, प्रा डॉ. चंद्रकांत जोगदंड, गंगाधर क्षीरसागर,आदि कवींच्या दर्जेदार कविता रंगणार आहेत.

सायंकाळी ६ ते ७ संमेलनात काही ठराव संमत करण्यात येणार आहेत. संमेलनाची सांगता राष्ट्रगीताने होणार आहे. या संमेलनास शिक्षक शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन स्वागत समितीचे शिवाजीराव बनसोडे, अजय कुमार गंडले, मुख्याध्यापक जी. बी. शेख नागनाथ बडे, प्राचार्य अतुल दुबे, प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे,बालासाहेब इंगळे, मुख्याध्यापक अशोक नावंदे, सौदागर कांदे, प्रा. विलास रोडे, मुख्याध्यापक शास्त्री कांबळे, मुख्याध्यापक के. डी. कांदे, प्रोफे.डॉ.माधव रोडे, केंद्रप्रमुख सतीश कारेपुरकर, सिद्धेश्वर इंगोले, विठ्ठलराव झिलमेवाड, विकास वाघमारे, नवनाथ दाने, पत्रकार महादेव गीते, विद्याधर शिरसाठ, विनायक काळे आदींनी केले आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणार ५४ नवीन वसतिगृह

## आरक्षणावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले...

प्रतिनिधी बीड

ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणीही धक्का लावू शकत नाही, पूर्वी याला धक्का लावण्याची मुभा होती पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओबीसी आयोग स्थापन करून त्याला संविधानिक दर्जा प्राप्त करून दिला आहे. त्यामुळे ओबीसीच्या आरक्षणाला कोणीही धक्का लावू शकत नाही असं वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात केलंय. ते नागपूर झाडे कुणबी समाजाच्या वसतिगृह भूमिपूजन समारंभा प्रसंगी बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७० वर्षात पहिल्यांदा ओबीसी समाजाला संविधानिक स्थान देऊन ओबीसी आयोग स्थापन केला. पूर्वी हा केवळ जीआर वर आधारित होता. त्यामुळे कुठल्याही कोर्टाला ओबीसीच आरक्षण हे उलटवून लावण्याची एक प्रकारे मुभा होती. त्यामुळे ओबीसीला आयोगाच्या माध्यमातून संविधानिक स्थान प्राप्त झाल्याने कोणीही ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू शकत नाही, अशा पद्धतीची व्यवस्था पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओबीसी आयोगाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे. ओबीसींना २७ टक्के आरक्षण हे सगळीकडे मिळायचं मात्र केंद्रीय कोटच्यामध्ये ओबीसी समाजाला एमबीबीएसच्या ऍडमिशनमध्ये आरक्षण मिळत नव्हतं.



मध्यंतरी सरकार नसताना अनेक काम थांबलं होतं. मात्र आता ओबीसी विद्यार्थ्यांसाठी येत्या दोन महिन्यात ५४ नवीन वसतिगृह सुरू करण्यात येणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात जागा मिळणार नाही. त्यांच्यासाठी स्वयंसारख्या योजनेच्या माध्यमातून खात्यात पैसे जमा करू. जेणेकरून ते स्वतः खोली करून भाड्याने राहू शकतील असा निर्णय घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

नागपुरातील पिंपळा ग्रामपंचायत अंतर्गत झाडे कुणबी समजाचा जागेवर राज्य सरकारने दिलेल्या निधीतून विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आणि इ लायब्ररीचे बांधण्यात येणार आहे. याचं भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलेय. यावेळी झाडे कुणबी समाजातील अनेकांनी चांगले कार्य करून समाजासाठी केलेल्या कार्यासाठी त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी खासदार सुनील मेंढे, आमदार मोहन मते, आमदार टेकचंद सवकरकर, माजी आमदार सुधाकर कोहळे उपस्थित होते..

मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे कार्यालय,
'सहकार शक्ती' इमारत, जालना रोड, बीड.
रासनिप्रा
{Phone No. ०२४४२-२२२३२१; Email Id :ddr_bid@rediffmail.com}

जा.क्र. निवडणुक/ प्रारुप मत. प्रसि. बा./ ४५९ /२०२४
दिनांक :- ०५ फेब्रुवारी, २०२४

// जाहीर प्रगटन //

मा. प्राधिकरणाच्या सुचनेनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम, २०१४ चे नियम ४ (ii) नुसार "ब" वर्गातील अ. क्र.०१ ते ०४ सहकारी संस्थांच्या प्रारुप मतदार यादी अंतिम करणेबाबतचा निवडणुक कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे

| अ.क्र | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.०५/०२/२०२४ | स. ११.०० वाजता | संबंधित संस्थेचे कार्यालय व सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.अंबाजोगाई/ धारुर/केज/परळी वै या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर. |
| २ | प्रारुप मतदार यादीवर दावे / हरकती घेणे | दि.०५/०२/२०२४ ते दि.१४/०२/२०२४ | स.११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड |
| ३ | प्राप्त दावे व हरकतीवर सुनावणी घेणे | दि. २०/०२/२०२४ | सकाळी ११.३० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड |
| ४ | प्राप्त दावे व हरकतीवर निर्णय घेणे | दि. २६/०२/२०२४ | दु. ०५.३० वा. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड |
| ५ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.०४/०३/२०२४ | स.११.०० वाजता | संबंधित संस्थेचे कार्यालय व सहायक निबंधक, सहकारी संस्था ता.अंबाजोगाई/ केज/धारुर/परळी वै या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर. |

**टिप : प्रारुप मतदार यादीवर आक्षेप सादर करताना आक्षेपकर्त्याने पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करणे बंधनकारक राहील. आक्षेपकर्त्याने पुराव्याशिवाय दाखल केलेला आक्षेप अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

वरील निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे खालील संस्थांवरील दावे/हरकतीवर सुनावणी

| अ.क्र | संस्थेचे नाव | सुनावणी दिनांक | सुनावणीची वेळ |
|---|---|---|---|
| १ | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, म.गावंदरा, ता. धारुर, जि. बीड | २०-०२-२०२४ | स. ११.०० वा. |
| २ | राजर्षी शाहु तालुका ग्रामीण नागरी सहकारी पतसंस्था, म. केज, जि. बीड | २०-०२-२०२४ | स. ११.३० वा. |
| २ | स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था, म. अंबाजोगाई, जि. बीड | २०-०२-२०२४ | दु.१२.०० वा. |
| ३ | सावित्रीबाई फुले शिक्षक सहकारी पतसंस्था, म. परळी वै., जि. बीड | २०-०२-२०२४ | दु. १२.३० वा. |

(समृत जाधव)
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड.

**जाहिर प्रगटन**
**मा. श्रीमती के.सी. बागल, ८ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २९४/२०२४**
**अँड टी व्ही जाधव यांच्या मार्फत**
**उर्मिला व इतर वि निरंक**
**ज्यापेक्षा उत्तम श्रीराम शिंदे, रा. लोणीघाट, ता.जि.बीड हे दिनांक ११.०७.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. आणि तसेच**
**अर्जदार १.उर्मिला उत्तम शिंदे रा. लोणीघाट, ता.जि. बीड**
**२ अमोल उत्तम शिंदे रा. सदर**
**३ यश उत्तम शिंदे रा. सदर अ.पा.क. आई अर्जदार क्र.१**
**४ कुसुम श्रीराम शिंदे रा. सदर**

अर्जदार क. १ ही मयत उत्तम श्रीराम शिंदे यांची पत्नी असून, अर्जदार क्र.२ व ३ हे मयताचे मुले तसेच अर्जदार क. ४ ही मयताची आई आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदाराच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत उत्तम श्रीराम शिंदे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

पु.ता. ०७.०३.२०२४

आज दिनांक ०१ फेब्रुवारी २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**प्र.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

**अ‍ॅड. वाळुंजकर एस जे**
**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १४५/२०२४**
**बाजीराव रविंद्र भोसले व इतर विरूध्द निरंक**
**अर्जदार -१. बाजीराव पि. रविंद्र भोसले, रा. पिंपळवाडी, ता.जि. बीड**
**२. धनंजय पि. रविंद्र भोसले, रा. वरील प्रमाणे**
**३. सुमन भ्र. रविंद्र भोसले, रा. वरील प्रमाणे**
**विरुध्द**
**निरंक**
**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रविंद्र आश्रुबा भोसले यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत रविंद्र आश्रुबा भोसले यांचा मृत्यु दिनांक २५/११/२०१६ रोजी झाला आहे. यांचे मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत रविंद्र आश्रुबा भोसले यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रविंद्र आश्रुबा भोसले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०१/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०२/२०२४ आहे.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एस.पी.वानखडे यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३१/२०२४**
गणेश पि.दिनानाथ शिंदे व इतर विरुध्द निरंक
**(मार्फत-ॲड.आर.यु.पंडित, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **दिनानाथ साहेबराव शिंदे हे दि.१२.१०.२०२३ रोजी मौजे सिरसदेवी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१) गणेश पि. दिनानाथ शिंदे, वय ४० वर्षे, रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि.बीड, २) राहुल पि. दिनानाथ शिंदे, वय ३४ वर्षे, रा. सदर, ३) सोनाली भ्र. आनंद पुंड, वय ३५ वर्षे, रा. पिंपळगांव निमजी, ता.जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत दिनानाथ साहेबराव शिंदे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१०/०१/२०२४** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२१/०२/२०२४**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**जाहीर प्रगटन**
**मा. श्रीमती डी के पाटील ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १४०/२०२४**
**निकीता व इतर विरुध्द निरंक**
**ॲड. टी बी भालेराव**
**अर्जदार :- १) निकीता पि. दिलीप आवचर वय रा. वडवाडी बोरखेड ता. जि. बीड. २४ वर्षे, धंदा शिक्षण,**
**२) अनिकेत पि. दिलीप आवचर, वय रा. वडवाडी बोरखेड ता. जि. बीड. २० वर्षे, धंदा शिक्षण**
**विरुध्द**
**निरंक**
**मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत...**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **मिना भ्र. दिलीप आवचर** यांचे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत नामे मिना भ्र. दिलीप आवचर रा. वडवाडी बोरखेड ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक ०२/०१/२०२४ रोजी बोरखडे ता. जि. बीड** येथे झाला. अर्जदार क. ०१ ही मयताची मुलगी असून अर्जदार क. ०२ हा मयताचा मुलगा आहे. मयताचे पती यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार क. ०१ व ०२ हे मयताचे वारस आहेत व मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार क. ०१ व ०२ यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत मिना भ्र. दिलीप आवचर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/०१/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक ०२/०३/२०२४

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

**अंड, एम एस. उबाळे**
**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ११५/२०२४**
**जिजाबाई राजेंद्र झुनगुरे व इतर विरूध्द निरंक**
**अर्जदार १. जिजाबाई प्र. राजेंद्र झुनगुरे,**
**रा. आय टी आय ने मागे, सर्कस मैदान (पूर्व), बीड ता. जि. बीड**
**२.शुभम पि. राजेंद्र सुनगुरे, रा. वरील प्रमाणे**
**३. ऋषीकेश पि. राजेंद्र झुनगुरे, रा. वरील प्रमाणे**
**४. सुशिलाबाई प्र. बाबासाहेब झुनगुरे, रा. वरील प्रमाणे**
**विरुध्द**
**निरंक**
**मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत राजेंद्र बाबासाहेब झुनगुरे यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत राजेंद्र बाबासाहेब झुनगुरे यांचा मृत्यु दिनांक २८/१२/२०२३ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत राजेंद्र बाबासाहेब झुनगुरे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे बारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत राजेंद्र बाबासाहेब झुनगुरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/०१/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०२/२०२४ आहे.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

**जाहीर प्रगटन**
**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ११७/२०२४**
**स्मिता विरुध्द निरक**
**अर्जदार**
**१. स्मिता भ्र. नितीन महानवर,**
**३५ वर्ष, चंदा परकाम, रा भक्ती कन्स्ट्रक्शन, एकनाथ नगर, बीड ता जि.वीड**
**२. जान्हवी पि. नितीन महानवर, वय १३ वर्षे गंदा शिक्षण, अज्ञान अपाक आई अर्जदार क्र. १ रा सदर**
**३. भुमी पि. नितीन महानवर, वय १२ वर्षे, भंदा शिक्षण,**
**अज्ञान अपाक आई अर्जदार क्र. १ रा सदर**
**४. यमुनाबाई भ्र. कोंडीबा महानोर उर्फ महानवर, वय ७८ वर्षे, भदा रा सदर घरकाम,**
**विरुध्द**
**निरंक**
**मागणी -बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नितीन पि. कोंडीबा महानवर मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे

ज्याअर्थी मयत नितीन पि. कोंडीबा महानवर यांचा मृत्यु दिनांक २८/११/२०२२ रोजी झाला आहे बरोल

अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत नितीन पि. कोंडीबा महानवर यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यानी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाने हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्याना हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नितीन पि. कोंडीबा महानवर यांचे वारस असल्याबाबतने प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी,

आज दिनांक ३०/०१/२०२४ रोजी माइझे सहीने व न्यायालयने शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०१/०३/२०२४ आदेशावरून

शिक्का

स्वाक्षरित/-
**प्र.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

# गेवराईत संपादक विजयराज बंब यांचा सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा

**सामाजिक उपक्रम ; उपजिल्हा रुग्णालयात फळ वाटप तर तलवाडा येथे दिव्यांगांना खाऊसह शैक्षणिक साहित्य**

शेख आतिख/तलवाडा

समाजरत्न तथा दै.लोकाशाचे मुख्य संपादक विजयराजजी बंब साहेब यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करुन तालुक्यातील राक्षसभुवन, पांचाळेश्वरसह तलवाडा येथे विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला. दरम्यान गेवराई तालुक्यात ठिकठिकाणी यथोचित सत्कार करुन त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता तसेच राजकिय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. दै.लोकाशाचे संपादक विजयराजजी बंब यांचा दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा केला जातो. यावर्षी देखील गेवराई येथे उपजिल्हा रुग्णालयात फळ वाटप तसेच समाजोपयोगी उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी संपादक विजयराजजी बंब, उद्योजक राजेशशेट बंब, संजयशेट बंब, सामाजिक कार्यकर्ते गौतमशेट खटोड, निवासी संपादक उत्तमभाऊ हजारे, वृत्त संपादक भागवत तावरे, उपसंपादक मुकेश झनझने, व्यवस्थापक अतुल भालशंकर, सुरेशराव हात्ते, परमेश्वर महाराज वाघमोडे, विष्णू हत्ते, पुजा मोरे, डॉ.रांदड, डॉ. नोमाणी, पत्रकार अमोल वैद्य, सोमनाथ मोटे, गजानन चौकटे, प्रा.रामहरी काकडे, वैजीनाथ जाधव, अमोल कापसे, श्रीराम पौळ, विठ्ठल घुगे, अमोल भांगे, प्रविण करांडे, अमोल खरात, आर. आर. बहिर, बालाजी करांडे, रुग्णालयातील परिचारिका वैशाली राठोड सह आदी पत्रकार बांधव तसेच कर्मचारी उपस्थित होते.



### तलवाडा येथे त्वरितादेवी दर्शन व दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप


गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे त्वरितादेवीचे मनोभावे दर्शन घेवून कै.केशवरावजी धांडे मतिमंद निवासी विद्यालयात विजयराज बंब यांच्या हस्ते दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासह खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी उपसरपंच आक्रम सौदागर, शेख रफिक, मदन हातागळे, दत्ता हत्ते, किशोर हत्ते, पत्रकार अतिख शेख, विष्णु राठोड, अल्ताफ कुरेशी, जितेंद्र खरात, शेख खिजरभाई , जयदेव शिंगणे, कालू कुरेशी सह शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच दिव्यांग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथे शनि अभिषेक व भाविकांना खिचडीचे वाटप

गेवराई तालुक्यातील श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथे शनिच्या साडेतीन पीठांपैकी मुख्य आद्यपीठ असलेल्या श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथे शनिवारी विजयराज बंब यांच्या हस्ते अभिषेक तसेच महाआरती करुन शनी महाराजांचे त्यांनी मनोभावे दर्शन घेतले. त्यानंतर उपस्थित भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी गणेश महाराज बोचरे, प्रदीप काळम, डॉ सुपेकर, अझहर इनामदार, इरफान सय्यद, अकबर पिंजारी, कृष्णा जाधव, ज्ञानेश्वर हवाले, जिजा कवचट, धोंडराई सरपंच शितल साखरे, जिजा नाटकर, अक्षय पाठक, पद्माकर पाठक, हरिभाऊ आरबड, कैलास खोबरे, अशोक सुरज अन्नदाते, रवि कोठी, राजेंद्र कोठी, बाबासाहेब कोठी, भारत उदरभरे, कैलास पोटफोडे सह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रीक्षेत्र पांचाळेश्वर येथे श्री दत्त व श्री दिगंबर जैन मंदिर येथे दर्शन

श्री क्षेत्र आत्मतिर्थ पांचाळेश्वर येथील पवित्र व श्रेष्ठ दत्तप्रभुंच्या भोजन स्थान ठिकाणी व श्री १००८ नंदीश्वर दिगंबर जैन मंदिर येथे संपादक विजयराज बंब यांनी मनोभावे पुजा करुन दर्शन घेतले तसेच येथील गरजूंना मदतही केली. यावेळी देवस्थान ट्रस्टच्या वतीने यथोचित सत्कार करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पदाधिकाऱ्यांसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बीड येथील युवा सामाजिक कार्यकर्ते रोहन गायकवाड यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षात प्रवेश

**ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाळा बांगर, शहराध्यक्ष सचिन जाधव यांच्या उपस्थितीत परळीत झाला प्रवेश**

परळी ।प्रतिनिधी

बीड येथील युवा सामाजिक कार्यकर्ते रोहन गायकवाड यांनी त्यांच्यासोबतच्या असंख्य युवा कार्यकर्त्यांच्या सोबत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण यांच्या हस्ते, ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड व युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाळा बांगर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

बीड राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष सचिन जाधव यांच्या पुढाकारातून आज रोहन गायकवाड यांनी असंख्य युवा कार्यकर्त्यांना सोबतीला घेऊन, परळी येथील ना.धनंजय मुंडे यांच्या जगमित्र कार्यालयात हा पक्ष प्रवेश घेतला. रोहन यांनी यावेळी अनेक गाड्यांचा मोठा ताफा सोबतीला आणून असंख्य युवा कार्यकर्त्यांसोबत शक्तिप्रदर्शन केले. रोहन गायकवाड यांचे ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, युवक अध्यक्ष बाळा बांगर यांनी पक्षाचा गमजा देऊन स्वागत केले, तसेच पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी बीडचे शहराध्यक्ष सचिन जाधव यांच्यासह सोफवान खान, रवी आघाव, सोनू पवार, अशोक जावळे आदींची उपस्थिती होती.

पोलिस निरिक्षक संतोष खेतमाळस यांच्या पुढाकारातून आष्टा येथे

# ग्राम सुरक्षा दलाची स्थापना तरुणांच्या हाती गावाची सुरक्षा पोलिसांचा भार होणार हालका

आष्टी ।प्रतिनिधी

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी खाकी वर्दीतील पोलिस कार्यरत आहेतच. परंतु ग्रामीण भागात वाडी, वस्त्यांवर पडणारे दरोडे आणि गुन्हेगारी घटनांना प्रतिबंध करणे, यासाठी आष्टा ह. ना. गावची सुरक्षा आता तरुणांच्या हाती असून आष्टा हरिनारायण परिसरासाठी ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस यांनी यासाठी पुढाकार घेतला तरुणांना किट वाटप ही पो.नि. खेतमाळस यांच्या हस्ते करण्यात आले.

तालुक्यातील आष्टा ह.ना.येथे ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करून त्या माध्यमातून गावातील सुरक्षेची जबाबदारी आता तरुण घेणार



आहेत. आष्टी पोलिस ठाण्यांतर्गत घडणाऱ्या घटनांमध्ये अपघातग्रस्तांना मदतीसाठी ग्रामसुरक्षा दलातील सदस्य धाव घेत असल्याने पोलिस यंत्रणेवरील कामाचा ताण काही अंशी कमी होणार आहे.आष्टा ह.ना. येथील १५ तरुणांनी ग्रामसुरक्षा दलामध्ये सहभाग घेतला असून, यामध्ये ग्रामीण भागात वाडी, वस्त्यांवर पडणारे दरोडे आणि गुन्हेगारी घटनांना प्रतिबंध करणे, ही प्रामुख्याने या दलाची जबाबदारी. त्यासाठी दलाच्या सदस्यांकडून गस्त घातली जाते.

या माध्यमातून स्थानिक पातळीवर सुरक्षा व्यवस्थेची फळी उभारली गेल्यामुळे पोलिस यंत्रणेवरील कामाचा ताण काहीसा हलका होणार आहे.दि.२ फेब्रुवारी रोजी पोलिस निरीक्षक संतोष खेतमाळस

यांच्या पुढाकारातून १५ सदस्य असलेल्या ग्रामसुरक्षा दलाची स्थापना झाली.सदस्यांना काठी,टि- शर्ट,बॅटरी यासह आवश्यक असलेले साधनांचे किट पोलिसांच्या वतीने देण्यात आले.

### चोरी करणाऱ्यांवर राहणार 'वॉच'

आष्टा गावची ग्रामसुरक्षा यंत्रणेतील आता चोरी करणाऱ्यांवर सागर गळगटे, मंगेश राऊत,दीपक माळवे,अजय गळगटे, बाळू पठाडे,अशोक मिसाळ,परमेश्वर डोंगरे,विलास रोकडे,शहाबाद शेख,आजिनाथ कांबळे,गणेश गळगटे,गणेश राऊत,आत्माराम कांबळे,बापूराव गळगटे, गणेश धोंडे यांचा वॉच राहणार आहे. यामुळे आता ग्रामसुरक्षा दलाच्या तरुणांचे व्हॉट्सप ग्रुप बनविले असून, गावात किंवा परिसरात कुठेही काही घटना घडल्यास या ग्रुपमार्फत लगेच पोलिसांना कळणार आहे. या आपातकालिन परिस्थितीत देखील या तरुणांची मदत होणार आहे. अपघातप्रसंगी दलातील सदस्य धाव घेऊन जखमींना दाखल करण्यासाठी मदत करणार आहेत.

# सौ.सीमा ओस्तवाल प्रेरणादायी पुरस्काराने सन्मानित

**गुरु माऊली प.पू.श्री अण्णासाहेब मोरे व माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते थाटात वितरण**

बीड ।प्रतिनिधी

बीड येथील गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या सौ. सीमा ओस्तवाल यांना मान्यवरांच्या हस्ते '' प्रेरणादायी महिला पुरस्कार '' देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सोहळा नाशिक शहरातील डोंगरे वसतिगृह मैदान, गंगापूर रोड येथे जागतिक कृषी महोत्सवात दिनांक २६ जानेवारी रोजी थाटात संपन्न झाला.

श्री स्वामी समर्थ कृषी विकास व चॅरिटेबल ट्रस्ट नाशिक यांच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ''महिलांचा प्रेरणादायी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सौ सीमा ओस्तवाल यांना २०२४ चा प्रेरणादायी महिला पुरस्कार जाहीर झाला होता. २६ जानेवारी रोजी हा पुरस्कार सोहळा पार पडला.यावेळी या कार्यक्रमाला उपस्थित गुरु माउली परमपूज्य श्री आण्णासाहेब मोरे आणि राज्याच्या माजी ग्रामविकास मंत्री सौ .पंकजाताई मुंडे,आमदार सौ. सीमाताई होरे,सरपंच परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दत्ताजी काकडे,अशा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला सौ सीमा ओस्तवाल या मागील काही वर्षांपासून गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजातील विविध गरजू घटकांना मदत करत असतात, त्यांच्या या कार्याचा अनेकदा गौरव झालेला आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ सीमा वस्तू यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# आष्टी नमो चषक क्रिकेट स्पर्धेत राजे संभाजी वॉरियर्स संघाने पटकावला प्रथम क्रमांक

आष्टी ।प्रतिनिधी

येथील हंबर्डे महाविद्यालयाच्या मैदानावर २६ जानेवारी पासून सुरू असलेल्या नमो चषक क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी (ता.२) धोंडे वॉरियर्स संघाला १८ धावांनी नमवत राजे संभाजी वॉरियर्स संघाने आष्टी नमो चषक क्रिकेट स्पर्धा जिंकली. विजेत्या संघाला मान्यवरांच्या उपस्थितीत एक लाख रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

राजे संभाजी वॉरियर्स, धवलगिरी इंडियन्स, आण्णा वॉरियर्स, धोंडे वॉरियर्स, समशेर फायटर्स, नवाब चॅम्पियन्स, एम के ईलाटस, तोडकर ग्रुप पँथर्स आठ संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये शेवटची लढत राजे संभाजी वॉरियर्स विरुद्ध धोंडे वॉरियर्स या संघात चुरशीची होऊन राजे संभाजी वॉरियर्स संघाने धोंडे वॉरियर्स संघावर मात करत हा सामना जिंकला. धोंडे वॉरियर्स हा संघ उपविजेता तर धवलगिरी इंडियन्स तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. विजेत्या




**एक लाख रुपये व चषक देऊन सन्मानित**

संघाला १ लाख रुपये व नमो चषक, उपविजेत्या संघाला ७१ हजार रुपये व नमो चषक तसेच तृतीय संघाला ४१ हजार रुपये व नमो चषक मान्यवरांच्या उपस्थितीत देऊन सन्मानित करण्यात आले. आष्टी शहरामध्ये प्रथमच क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रेक्षकांना दर्जेदार आणि चुरशीचे क्रिकेट सामने पहायला मिळाले. क्रिकेटचे खेळाडू ग्रामीण भागात देखील तयार होत असून याचा अनुभव या सामन्यांमधून आष्टी तालुक्यातील प्रेक्षकांना आला. या क्रिकेट स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीने उत्कृष्ठ व्यवस्था केली होती.



**श्री.क्षेत्र सोनारी येथील कुलदैवत कालभैरवनाथ देवस्थानचे मुख्य पुजारी श्री.संजय चंद्रकांत पुजारी महाराज यांनी नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली यावेळी महाराजांचे सत्कार करुन स्वागत केले..याप्रसंगी परांडा पोलिस स्टेशनचे झ.ड.ख मुळे साहेब, माजी सैनिक शिवप्रसाद माळवदे, सागर पुजारी,डॉ अक्षय माळवदे, भैय्यासाहेब वाघमोडे उपस्थित होते.(छाया-संभाजी लांडे)**

# ताराबाई पोपळे यांचे दुखद निधन

प्रतिनिधी बीड

शिरूर तालुक्यातील आर्वी येथील श्री अंकुश रामराव पोपळे यांच्या मातोश्री ग. भा .ताराबाई रामराव पोपळे वय ८२ यांच्या अल्पसा आजाराने निधन दिनांक ३ /२/२०२४ रोजी झाले असून त्यांच्यावर अंत्यसंस्कार दिनांक ४ /२/



२० २४ रोज रविवार आर्वी येथील अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी गावातील नागरिक मोठ्या सहभागी झाले होते

# कान्हापुर ग्रामपंचायत मध्ये ओबीसी घरकुल लाभार्थ्यांची अडवणूक

**लाभार्थी यांनी दिला उपोषण आंदोलन करण्याचा इशारा**

संभाजी लांडे ।वडवणी

वडवणी तालुक्यातील कान्हापुर ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत असणारे मामला येथील ओबीसी प्रवर्गातील घरकुल प्रस्ताव दाखल करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी हे ठराव देत नसुन घरकुल लाभार्थ्यांची अडवणूक करत आहेत तरी घरकुल प्रस्ताव ठराव तात्काळ देण्यात यावा नसता उपोषण आंदोलन करण्याचा इशारा गटविकास अधिकारी प.स.वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे मामला येथील १६ ओबीसी लाभार्थी यांनी दिला आहे.

वडवणी तालुक्यातील कान्हापुर ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत मामला येथील १६ ओबीसी प्रवर्गातील नागरिकांनी घरकुलचा लाभ घेण्यासाठी ग्रामविकास अधिकारी यांना प्रस्ताव घेऊन ठराव देण्याची मागणी केली असता ग्रामविकास अधिकारी यांनी नकार दिला तसेच ओबीसी प्रवर्गासाठी असलेले घरकुल अद्यापही प्रस्तावित केलेले नाहीत तरी ग्रामविकास अधिकारी हे ओबीसी लाभार्थी यांची जाणीव पूर्वक अडवणूक करत असुन त्यांच्या या अडवणूकीमुळे ओबीसी लाभार्थी हे घरकुल योजना पासून वंचित राहू शकतात तरी ग्रामविकास अधिकारी यांनी तात्काळ ओबीसी लाभार्थी यांचे घरकुल ठराव मध्ये नावे घेऊन प्रस्ताव दाखल करून घ्यावेत व आम्हाला न्याय द्यावा नसता पंचायत समिती कार्यालया समोर उपोषण आंदोलन करण्याचा इशारा दि.३१ जानेवारी रोजी गटविकास अधिकारी वडवणी, तहसीलदार वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे मामला येथील ओबीसी घरकुल लाभार्थी सुमंत नाईकनवरे, नारायण नाईकनवरे,अच्युत नाईकनवरे, दत्ता यादव, लालासाहेब यादव, संजीवनी नाईकनवरे,भागुजी नाईकनवरे, अशोक यादव, किसनराव यादव,गोरख यादव, अनंत टिपरे,लहु टिपरे, दत्ता टिपरे, राजेश नाईकनवरे, राधाकिसन टिपरे इत्यादीनी दिला आहे.


हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com